# विनियम क्र. १५/२०१९

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अतिथीगृहातील कक्ष आरक्षण व भाडे

## विनियम क्र.१५/२०१९

ज्या अर्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अतिथीगृह कक्ष आरक्षण व भाडे ठरविण्याच्या दृष्टीने नियमावली तयार करण्याकरीता मा.कुलगुरुंनी समिती गठीत केली.

आणि

ज्या अर्थी, वरील प्रयोजनार्थ मा.कुलगुरुंद्वारा गठीत समितीच्या शिफारशी त्यासोबतच्या सहपत्रांसह दि.५.९.२०१८ च्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्र.१३७ अन्वये मान्य केल्यात,

त्या अर्थी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अतिथीगृह कक्ष आरक्षणासंदर्भात खालील प्रमाणे विनियम तयार करण्यात येत आहे.

अ) या विनियमास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अतिथीगृहातील कक्ष आरक्षणासंदर्भातील विनियम क्र.१५/२०१९ असे संबोधण्यात येईल.

ब) हे विनियम व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या दिनांकापासून अस्तित्वात येईल.

क) व्याख्या- या विनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

१) ñविद्यापीठò म्हणजे अमरावती विद्यापीठ कायदा, १९८३ (महाराष्ट्र) XXXVII अन्वये स्थापन झालेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

२) ñविद्यापीठ अतिथीगृहò म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अतिथीगृह.

३ ) ñकक्षò म्हणजे विद्यापीठ अतिथीगृहातील निवास व्यवस्था असलेले कक्ष

४) ñभाडेò म्हणजे कक्ष आरक्षणासाठी द्यावे लागणारे शुल्क.

ड) विद्यापीठ अतिथीगृहाच्या कक्ष आरक्षणासंबंधीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहील.

१) विद्यापीठ अतिथीगृहातील कक्ष आरक्षणाकरीता रितसर लेखी स्वरुपात/ ऑनलाईन मागणी आल्यास वरिष्ठांच्या मान्यतेने कक्ष उपलब्ध करुन देण्यात येतील.

२) विद्यापीठ अतिथीगृहातील कक्षाचे आरक्षण कमीत कमी सात दिवस अगोदर करावे लागेल.

३) विद्यापीठ अतिथीगृहातील कक्ष आरक्षण उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

४) विद्यापीठ अतिथीगृहातील कक्ष आरक्षणासंबंधात परस्पर तेथील कार्यरत कर्मचा-यांना कक्षाची मागणी करता येणार नाही.

५) विद्यापीठ अतिथीगृहातील कक्ष आरक्षणासाठी अग्रीम रक्कम आरक्षणाच्या वेळी जमा करावी. त्याशिवाय आरक्षण होणार नाही. विद्यापीठ खाती जमा केलेले शुल्क परत केल्या जाणार नाही.

६) विद्यापीठ अतिथीगृहात आरक्षणाशिवाय कोणालाही कक्ष उपलब्ध करुन दिला जाणार नाही. कक्ष आरक्षणासाठी विद्यापीठ खाती जमा केलेले शुल्क परत केल्या जाणार नाही.

७) संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना ओळखपत्राशिवाय कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

८) इतरही व्यक्तींना स्वतःचे ओळखपत्र दाखविल्याशिवाय कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

९) कक्षात राहणा-या व्यक्तींचा दर्जा लक्षात घेऊन अतिथीच्या प्रकारानुसार भाडे आकारण्यात येईल.

१०) एका कक्षात एकापेक्षा जास्त व्यक्ती राहिल्यास व त्यापैकी एकाच व्यक्तीला विनामुल्य राहण्याची परवानगी असल्यास सोबतच्या व्यक्तीचे नियमानुसार भाडे आकारण्यात येईल.

११) एका कक्षात दोन व्यक्तींपेक्षा जास्त व्यक्ती राहू शकणार नाही.

१२) विद्यापीठ अतिथीगृहातील मेसधारकाने व्यक्तीगत अथवा खाजगी कार्यक्रमाच्या भोजनाची व्यवस्था पूर्वपरवानगीनेच करावी.

१३) विद्यापीठ अतिथीगृहाच्या मेसमध्ये शुद्ध शाकाहारी भोजनाची व्यवस्था केली जाईल.

१४) भोजनाची व्यवस्था कक्षामध्ये किंवा दर्शनी हॉलमध्ये सोफ्यावर कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही.

१५) विद्यापीठ अतिथीगृह व परिसरात मद्यपान व धुम्रपान वर्जित राहील.

१६) विद्यापीठाचे केंद्रीय मुल्यांकन अधिकारी व मनुष्यबळ विकास केंद्र येथील परीक्षक व शिक्षकांकरीता पूर्वमान्यता घेऊन एक महिन्याकरीता विद्यापीठ अतिथीगृहातील कक्षाचे आरक्षण करण्यात येते. त्यामुळे ते कक्ष त्यांच्या नावे आरक्षित करता येईल. अशा परिस्थितीत सदर कक्ष इतर व्यक्ती अथवा विभागांना देता येणार नाही. संबंधित विभागाचे शिक्षक अथवा परिक्षक पूर्ण महिन्याभरात काही दिवस जरी आले तरी सदर कक्षाचे एका महिन्याचे भाडे संबंधित विभागाला भरावे लागेल.

१७) अतिथीगृहातील कक्ष विनामुल्य पाहिजे असल्यास, त्याकरीता कमीत कमी पंधरा दिवसापूर्वी विद्यापीठ अतिथीगृहामध्ये प्रपत्र भरुन घ्यावे. मा.कुलगुरुंनी विनामुल्य कक्ष आरक्षित करण्यास परवानगी/मान्यता दिल्यास कक्ष विनामुल्य आरक्षित करण्यात येईल. परंतु विनामुल्य कक्ष आरक्षणाला मान्यता न मिळाल्यास कक्ष आरक्षित करणाऱ्या विभागाला किंवा व्यक्तीला नियमाप्रमाणे कक्षाचे संपूर्ण भाडे आकारल्या जाईल.

१८) विद्यापीठ अतिथीगृहामध्ये स्थानिक व्यक्तींच्या निवासाची व्यवस्था करता येणार नाही.

१९) अपवादात्मक वरिस्थिती वगळता विद्यापीठ अतिथीगृहात कोणत्याही अतिथींकरीता तीन दिवसांपेक्षा अधिक काळ कक्ष आरक्षण उपलब्ध करुन देता येणार नाही.

२०) विद्यापीठ अतिथीगृहात ज्यांची निवास व्यवस्था करण्यात आली आहे, अथवा ज्यांचे नांवे कक्ष आरक्षण करण्यात आलेले आहे. फक्त त्यांनाच त्याठिकाणी राहता येईल.

ई) विद्यापीठ अतिथीगृहामधील कक्षाचे भाडे खालील प्रमाणे राहील.

| अ. क्र. | अतिथी | कक्ष भाडे | | |
|---|---|---|---|---|
| | | साधा कक्ष प्रतीदिन प्रतीव्यक्ती | व्ही.आय.पी. कक्ष प्रतीदिन प्रतीव्यक्ती | व्ही.व्ही.आय.पी.कक्ष प्रतीदिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **शासकीय-** | | | |
| | i) राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त विद्यापीठाच्या दौऱ्यावर असणारे अधिकारी | २०० | ४०० | -- |
| | ii) राज्य शासनाचे विद्यापीठाचे दौऱ्यावर नसणारे अधिकारी | ५०० | ८०० | -- |
| **अ. क्र.** | **अतिथी** | **कक्ष भाडे** | | |
| | | **साधा कक्ष प्रतीदिन प्रतीव्यक्ती** | **व्ही.आय.पी. कक्ष प्रतीदिन प्रतीव्यक्ती** | **व्ही.व्ही.आय.पी.कक्ष प्रतीदिन** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| | i) व्यवस्थापन परिषदेचे सदस्य/अधिष्ठाता/माजी व्यवस्थापन परिषद सदस्य/माजी अधिष्ठता/ अधिसभा सदस्य/विद्वत परिषद सदस्य/परीक्षा मंडळ सदस्य | २०० | ४०० | -- |
| | ii) विद्यापीठाशी निगडीत निरनिराळ्या समित्यांचे सदस्य विद्यापीठाच्या कामावर असतांना | २०० | ४०० | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | iii) विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाचे अतिथी/अधिकारी | ५०० | १००० | ३००० |
| | iv) वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक | ५०० | ८०० | -- |
| | v) कर्मचारी संघाचे पदाधिकारी/सदस्य | ५०० | ८०० | -- |
| ३ | **इतर विद्यापीठे -**<br>i) इतर विद्यापीठाचे अधिकारी/कर्मचारी/शिक्षक विद्यापीठाच्या कामाने दौऱ्यावर असतांना | २०० | ८०० | -- |
| | ii) इतर विद्यापीठाचे अधिकारी/कर्मचारी/शिक्षक विद्यापीठाच्या कामाने दौऱ्यावर नसतांना | ५०० | १२०० | -- |
| ४ | **खाजगी-**<br>खाजगी व्यक्ती | ६०० | १५०० | -- |
| ५ | **सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी-**<br>या विद्यापीठाचे तथा शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी | ३०० | -- | -- |
| ६ | **मा.कुलगुरु यांचे लेखी आदेशाने विनामुल्य निवास व्यवस्था-**<br>i) विद्यापीठाचे आजी/माजी मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | ii) विविध कार्यक्रमानिमित्ताने विद्यापीठाने पाहूणे म्हणून आमंत्रित केलेले अतिथी | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | iii) इतर विद्यापीठाचे आजी/माजी मा.कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | iv) निवड समित्यांचे सदस्य | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | v) Visiting Fellow/Visiting Professor | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | vi) विनामुल्य निवास व्यवस्थेकरीता ज्यांचेसोबत करार झालेला आहे, अशा व्यक्ती | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | vii) आचार्य पदवीकरीता येणारे परीक्षक | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | viii) R.R.C. सभा सदस्य | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |
| | ix) इतर सन्माननीय व्यक्ती | विनामुल्य | विनामुल्य | विनामुल्य |

*****